दिव्य मराठी

सोलापूर सिटी

04-07-2026

# सोलापूर विद्यापीठात सायबर क्लबची स्थापना

प्रतिनिधी | सोलापूर

विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलामध्ये \'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा\' या उपक्रमांतर्गत सायबर क्लबची स्थापना करण्यात आली. हा उपक्रम क्विक हील फाउंडेशनसोबत झालेल्या सामंजस्य कराराच्या अंतर्गत राबवण्यात येणार आहे. संगणकशास्त्र संकुलामध्ये २०१७-२०१८ पासून हा उपक्रम राबविला जातो.

सायबर क्लबच्या पदाधिकाऱ्यांची निवड नुकतीच करण्यात आली असून, विपाशना खराटे यांची अध्यक्ष, प्रणाली मसाळ यांची सचिव, सौंदर्या कांबळे यांची ॲक्टिव्हिटी डायरेक्टर तर सचिन धामणेकर यांची मीडिया डायरेक्टर म्हणून निवड करण्यात आली आहे. संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजीवकुमार मेंते हे क्लबचे समन्वयक म्हणून कार्य पाहणार आहेत.



## क्लबच्या माध्यमातून कार्यशाळा, व्याख्यानाचे आयोजन

क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल साक्षरता आणि सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम, कार्यशाळा, व्याख्याने व जनजागृती मोहिमा आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण होण्यास तसेच समाजात डिजिटल सुरक्षिततेचा संदेश पोहोचवण्यास मोठी मदत होणार असल्याचे मत कुलगुरू डॉ प्रकाश महानवर व प्र-कुलगुरू डॉ लक्ष्मीकांत दामा यांनी व्यक्त केले.

क्लबच्या पदाधिकाऱ्यांना पुणे येथील क्विक हीलच्या कार्यालयात विशेष प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण गायत्री केसकर व दीपू सिंग यांनी दिले. यावेळी फाउंडेशनच्या संचालिका अनुपमा काटकर तसेच अजय शिर्के यांनीही विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. सायबर सुरक्षेचे महत्त्व, डिजिटल सुरक्षितता, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि जनजागृती उपक्रमांची अंमलबजावणी याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.